(निवडणूक प्राथम्य )

“ड” वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना व आरक्षण करण्यासंदर्भातील अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्याच्या आदेशात बदल.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र


क्रमांक- रानिआ/मनपा- २०२५/प्र.क्र.७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० जुलै, २०२५.
ई-मेल: sec.corp@mah.gov.in


संदर्भ: १. नगर विकास विभागाचे आदेश क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि.१० जून,२०२५.

२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१६ जून, २०२५ चे आदेश व अधिसूचना.

३. नगर विकास विभागाचे आदेश क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दि. २३ जून २०२५ चे शुध्दीपत्रक.

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने संदर्भाधिन क्र.१ च्या आदेशान्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता प्रभाग रचना करण्यासंदर्भातील शासनाचे अधिकार “ड” वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत संबधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले होते;

**ज्याअर्थी,** “ड” वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना व आरक्षण ही प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करुन निवडणुका तात्काळ घेण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाने देखील संदर्भाधिन क्र.२ च्या आदेशान्वये “ड” वर्ग महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता सदस्य संख्या नमूद करुन प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चित करणे इत्यादीचे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान केले;

**ज्याअर्थी,** राज्य शासनाने संदर्भाधिन क्र.३ च्या शुध्दीपत्रकान्वये “ड” वर्ग महानगरपालिकांच्या प्रारुप व अंतिम प्रभाग रचनेचे प्रस्ताव नगर विकास विभागामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्याच्या दृष्टीने सुधारणा केली आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासनाने उपरोक्त शुध्दीपत्रकान्वये केलेल्या सुधारणेस अनुसरून राज्य निवडणूक अयोगाने “ड” वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारांमध्ये बदल करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ मधील अधिकारांचा व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(३) व कलम ५अ मधील तरतुदी अंतर्गत "ड" वर्ग महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता सदस्य संख्या नमूद करुन प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चित करणे इत्यादीचे, राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्याबाबत काढलेले समक्रमांकाचे दि.१६ जून, २०२५ चे आदेश व अधिसूचना रद्द करीत आहे.

त्यानुसार आता "ड" वर्ग महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता प्रारुप तसेच अंतिम प्रभाग रचनेस तसेच आरक्षणास मान्यता देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकांणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग(नवि-१),मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग(नवि-२),मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. सर्व जिल्हाधिकारी.
५. सर्व महानगरपालिका आयुक्त ("ड" वर्ग).
६. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
७. मा.आयुक्त व सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.
९. निवड नस्ती.